
M16/MPS911/EE/20160522

वेळ : 3 तास **गुण : 80**

विद्यार्थ्यांसाठी सूचना :

1. विभाग A वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नांचा आहे. त्याची उत्तरे उत्तरपत्रिका / OMR Sheet वर नोंदवायची आहेत.

2. OMR Sheet वरील चार पर्यायांपैकी अचूक पर्यायाखालील वर्तुळ काळ्या पेनाने पूर्ण भरावे. वर्तुळ अर्धवट भरल्यास अथवा एका प्रश्नास जास्त वर्तुळ भरल्यास ते उत्तर चुकीचे समजले जाईल.



A B C D

उत्तराची अयोग्य नोंद



A B C D

उत्तराची योग्य नोंद

3. बहुपर्यायी प्रश्नांमध्ये सर्वात अचूक उत्तरे नोंदविणे अपेक्षित आहे.

4. विभाग B वस्तुनिष्ठ विनापर्यायी स्वरूपाचा आहे. त्यासाठी स्वतंत्र उत्तरपत्रिका दिली आहे.

5. विभाग C हा दीर्घोत्तरी स्वरूपाचा असून आवश्यक तेथे नकाशा व आकृत्या काढणे अपेक्षित आहे.

6. विभाग A साठी प्रत्येक चुकीच्या उत्तरासाठी 1/3 उणे गुणपद्धत लागू आहे.

7. विभाग B आणि विभाग C साठी उणे गुणपद्धत लागू नाही.

SECTION - A (गुण : 26)

या विभागात एकूण 52 प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नाला अर्धा गुण याप्रमाणे हा विभाग 26 गुणांचा आहे. या विभागाला 1/3 उणे गुणपद्धत लागू आहे.

1. पाटलीपुत्र, राजगृह या प्रसिद्ध नगरी कोणत्या महाजनपदाचे वैभव मानल्या गेल्या?
   a) काशी
   b) चेदी
   c) मगध
   d) अंग

2. महापरिनिर्वाणसूत्र व बावरी जातक कथेत उल्लेख असलेले अस्सक नामक जनपद कोणत्या नदीच्या खोऱ्यात वसलेले होते?
   a) यमुना
   b) गोदावरी
   c) गंगा
   d) सिंधू

3. राजा बृहद्रथ मारला गेल्यामुळे मौर्यसत्ता कोणत्या वर्षी संपुष्टात आली?
   a) इ.स. पूर्व 177
   b) इ.स. पूर्व 187
   c) इ.स. पूर्व 180
   d) इ.स. पूर्व 195

4. मौर्योत्तर भारतात अस्तित्वात असलेल्या सत्तांमध्ये कोणती सत्ता अस्तित्वात नव्हती?
   a) शुंग
   b) कण्व
   c) मल्ल
   d) नाग

5. सतरावा सातवाहन राजा हाल याचा प्रसिद्ध ग्रंथ 'गाथा सप्तशती' कोणत्या भाषेत लिहिला गेला?
   a) अरबी
   b) संस्कृत
   c) प्राकृत
   d) हिंदी

6. कोणत्या चोळ राजाने स्वतःला 'गंगईकोंड' ही पदवी (उत्तरेकडील विजयानंतर) घेतली?
   a) राजराजेश्वर
   b) राजेंद्र पहिला
   c) राजेंद्र दुसरा
   d) राजादिव्य

7. फा-ह्यान या बौद्ध भिक्षूने लिहिलेला फोकोर्को हा ग्रंथ कोणत्या काळाचे प्रवासवर्णन आहे?
   a) मौर्य
   b) मौर्योत्तर
   c) गुप्त
   d) मध्ययुगीन

8. समुद्रगुप्ताच्या दिग्विजयी साम्राज्य विस्ताराचे वर्णन करणारा हरिषेण कवीचा शिलालेख कोठे सापडला?
   a) राजगृह
   b) प्रतिष्ठान
   c) अलाहाबाद
   d) जुनागड

9. सम्राट हर्षवर्धनाने आयोजित केलेली कनोजची सर्वधर्म परिषद कोणत्या वर्षी संपन्न झाली?
   a) इ.स. 643
   b) इ.स. 543
   c) इ.स. 650
   d) इ.स. 583

10. शक राजा रुद्रदामन याचा प्रसिद्ध शिलालेख _____ येथे सापडला.
   a) उज्जैन
   b) मथुरा
   c) कनोज
   d) जुनागड

11. वेरूळच्या लेणीसमूहातील कैलास लेणी _____ या राष्ट्रकूट राजाच्या राजाश्रयात कोरली गेली.
   a) दंतीवर्मन
   b) इंद्र
   c) कृष्ण पहिला
   d) गोविंद पहिला

12. मौर्य साम्राज्याच्या राजकीय तसेच आर्थिक बाबींसंबंधी माहिती देणाऱ्या 'अर्थशास्त्र' या ग्रंथाचा लेखक कोण?

a) बाणभट्ट

b) कौटिल्य

c) मॅगेस्थिनिस

d) चंद्रगुप्त मौर्य

13. मौर्य कालखंडात निर्माण झालेल्या श्रेणी, गण, पूग या _____ संघटना होत्या.

a) राजकीय

b) सामाजिक

c) सांस्कृतिक

d) व्यावसायिक

14. हुंडा घेऊन कन्या देणे ही _____ विवाह पद्धती होय.

a) दैव

b) राक्षस

c) गांधर्व

d) आसूर

15. _____ येथील शिलालेखावरून चोळांच्या साम्राज्यातील गावसभांची माहिती मिळते.

a) मदुराई b) उत्तरामेरूर

c) कांचीपुरम् d) बादामी

16. मॅगेस्थिनिसने समाजातील व्यवसायावर आधारित _____ वर्गाचे वर्णन केलेले आहे.

a) सात

b) आठ

c) दहा

d) बारा

17. _____ हे शूद्रकाचे गुप्तकालीन सामाजिक नाटक होय.

a) मृच्छकटिक

b) मुद्राराक्षस

c) मेघदूत

d) शाकुंतल

18. _____ यांनी श्रीबद्रिकेश्वर, द्वारका, जगन्नाथपुरी आणि शृंगेरी येथे मठांची स्थापना केली.

a) रामानुजाचार्य

b) शंकराचार्य

c) कबीर

d) चैतन्य

19. तराईची पहिली लढ़ाई _____ साली पृथ्वीराज चव्हाण आणि महंमद घोरी यांच्यात झाली.

a) 1191

b) 1291

c) 1151

d) 1251

20. महंमद घोरीच्या मृत्यूनंतर _____ याने दिल्लीस स्वतंत्र सत्ता स्थापन केली.

a) कुतुबुद्दीन ऐबक

b) इल्तमश

c) बल्बन

d) आरमशहा

21. दिल्ली सल्तनत कालखंडात _____ हा सैन्यप्रमुख होता.

a) दिवाण-इ-वझारत

b) दिवाण-इ-अर्झ

c) दिवाण-इ-इन्शा

d) दिवाण-इ-रसालत

22. राजपुत्र जोनाने तख्तावर बसल्यानंतर स्वतःला _____ हे नाव धारण केले.

a) महंमद बिन तुघलक

b) इल्तमश

c) फिरोझ शहा तुघलक

d) बल्बन

23. महंमद तुघलकाने राजधानीचे स्थलांतर दिल्ली येथून _____ येथे केले.

a) देवगिरी (हैदराबाद)

b) वरंगळ

c) मदुराई

d) प्रतिष्ठान

24. माधवाचार्य उर्फ विद्यारण्य यांच्या प्रेरणेने हरिहर आणि बुक्क यांनी _____ साम्राज्याची स्थापना केली.

a) बहमनी

b) विजयनगर

c) होयसळ

d) चोळ

25. कृष्णदेवराय या राजाचा 'अमुक्तमाल्यदा' हा ग्रंथ _____ या भाषेत आहे.

a) तेलगू

b) तामीळ

c) संस्कृत

d) प्राकृत

26. तालिकोटची लढाई _____ या साली रामराया आणि बहामनी राज्ये यांच्यात झाली.

a) 1560

b) 1565

c) 1580

d) 1585

27. इ.स. 1526 मध्ये बाबर आणि _____ यांच्यात पहिले पानिपतचे युद्ध लढले गेले.

a) सिकंदर लोदी

b) बहलोल लोदी

c) दौलतखान लोदी

d) इब्राहिम लोदी

28. _____ येथील विजयानंतर शेरखानने स्वतःस बादशहा म्हणून घोषित केले. तो आता 'शेरशाहा' झाला.

a) चौसाची लढाई

b) तालिकोटची लढाई

c) पानिपतची लढाई

d) कनौजची लढाई

29. शेरशहाच्या कारकिर्दीचा इतिहास _____ याने 'तारिखी शेरशाही' या नावाने लिहिला.

a) अमीर खुस्रो

b) जिया बरानी

c) अब्बासखान साखानी

d) शम्स-इ-सिराज अफीफ

30. पानिपतची दुसरी लढाई _____ साली अकबर आणि हेमु यांच्यात झाली.

a) 1530

b) 1580

c) 1556

d) 1586

31. मोगलशाहीतील गोंधळ लक्षात घेऊन संपत्ती मिळविण्याच्या हेतूने _____ याने 1739 मध्ये हिंदुस्थानवर स्वारी केली.

a) चिनक्लीजखान

b) अहमदशहा अब्दाली

c) नादिरशहा

d) महंमद घोरी

32. निजामशाहीच्या अस्तानंतर इ.स. 1636 साली शहाजीराजे _____ दरबारात पुन्हा दाखल झाले.

a) आदिलशाही

b) बरीदशाही

c) कुतुबशाही

d) मोगल

33. अफजलखानाच्या वधानंतर _____ बलाढ्य आदिलशाही सेनानीने पन्हाळगडास वेढा घातला.

a) शाहिस्तेखान

b) सिद्दी जोहर

c) जयसिंग

d) दिलेरखान

34. _____ साली शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला.

a) 1674

b) 1676

c) 1678

d) 1672

35. डॉ. आर्. एस्. शर्मा कोणत्या पेशव्याची तुलना पर्शियाच्या फ्रेडरिक दि ग्रेटशी करतात?

a) बाळाजी बाजीराव

b) माधवराव

c) पहिला बाजीराव

d) नानासाहेब

36. मध्ययुगीन भारतात 1451-1526 या काळात _____ यांनी दिल्लीवर राज्य केले.

a) खिलजी घराणे

b) तुघलक घराणे

c) लोदी घराणे

d) मोगल

37. रझियाने 'रझियासुद्दीन' म्हणजे _____ असा किताब घेतला होता.

a) राष्ट्रभक्त

b) धर्मभक्त

c) कर्तृत्ववान

d) सर्वज्ञानी

38. वैदिक कालखंडात धार्मिक विधी पार पाडण्यासाठी _____ हे महत्त्वाची भूमिका बजावत.

a) राजा

b) पुरोहित

c) संगृहित्री

d) ग्रामीणी

39. भारतातील पूर्व पुराणाश्म युगाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे _____ चा वापर.

a) लघुअस्त्रांचा

b) तांब्याच्या हत्यारांचा

c) लोखंडी हत्यारांचा

d) हातकुऱ्हाडीचा

40. _____ या दिल्ली सुलतानाने प्रथमच ब्राह्मणांवर जिझिया कर बसवला.

a) मुबारक खिलजी

b) अल्लाउद्दीन खिलजी

c) फिरोज तुघलक

d) महंमदशहा

41. अल्लाउद्दीनच्या दक्षिणेकडील स्वारीचे नेतृत्व _____ या सरदाराकडे होते.

a) मलिक काफूर

b) अहमदशहा

c) मलिक अंबर

d) महंमदशहा

42. 1398 साली _____ या मध्य आशियातील मोगल बादशहाने दिल्लीवर चढाई केली.

a) चेंगीज खान

b) चीनकुलीच खान

c) तैमुरलंग

d) महंमद घोरी

43. _____ हा बहामनी सुलतान विद्वान व साधूंचा सन्मान करणारा होता म्हणून त्यास 'वली' हे नाव मिळाले.

a) हसन

b) मुजाहिद शाह

c) फिरोज शाह

d) अहमद शाह

44. बहामनी राज्याच्या विघटनानंतर गोवळकोंडा येथे _____ अस्तित्वात आली.

a) आदिलशाही

b) बरीदशाही

c) कुतुबशाही

d) निजामशाही

45. _____ नदीच्या दक्षिणतीरावर हरिहर व बुक्क यांनी विजयनगर शहराची स्थापना केली.

a) गोदावरी

b) कावेरी

c) कृष्णा

d) तुंगभद्रा

46. अकबराच्या काळात सुरू झालेल्या मनसबदारी पद्धतीचे वर्णन _____ या ग्रंथात आढळते.

a) अकबरनामा

b) आइन-ए-अकबरी

c) तुघलकनामा

d) कझन-उल-फुतह

47. _____ हा मोगल काळात न्यायव्यवस्थेचा प्रमुख होता.

a) वाकनीस

b) वझीर

c) काझी

d) सरनौबत

48. _____ या मोगल बादशहाने स्वतःला आलमगीर हे नाव धारण केले.

a) अकबर
b) शहाजहान
c) जहांगीर
d) औरंगजेब

49. _____ यांनी शीख संप्रदायाची स्थापना केली.

a) गुरू नानक
b) गुरू अंगद
c) गुरू गोविंदसिंग
d) गुरू अमरदास

50. _____ राजघराण्यातील 'प्रभावतीगुप्त' ही लोककल्याणकारी, श्रेष्ठ प्रशासक म्हणून ओळखली जाते.

a) सातवाहन
b) गुप्त
c) वाकाटक
d) कुशाण

51. _____ येथील अशोकस्तंभ हा भारतीय शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना आहे.

a) दिल्ली
b) सारनाथ
c) अलाहाबाद
d) वाराणसी

52. बाराव्या शतकात बंगालच्या लक्ष्मणसेनाचा दरबारी कवी _____ याने 'गीतगोविंद' हे भावकाव्य लिहिले.

a) रत्नाकर
b) भट्टनारायण
c) जयदेव
d) सोमदेव

SECTION - B (गुण : 26)

या विभागात एकूण 26 प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नाला एक गुण याप्रमाणे हा विभाग 26 गुणांचा आहे. या विभागाला उणे गुणपद्धत लागू नाही.

1. पहिली बौद्ध धर्म परिषद कोणत्या मगध राजाच्या काळात पार पडली?
2. दक्षिणपथपती ही उपाधी कोणत्या राजघराण्याशी निगडित आहे?
3. प्रवरसेनानंतर वाकाटक राजघराण्याची (साम्राज्याची) विभागणी कोणत्या दोन शाखांमध्ये झाली?
4. वर्धन राजघराण्यातील श्रेष्ठतम सम्राट हर्षवर्धन याचे चरित्र लिहिणारा कवी कोण?
5. नागसेन व राजा मिनँडर (मिलिंद) यांच्या बौद्धतत्त्वज्ञान विषयक चर्चा कोणत्या ग्रंथात नमूद आहेत?
6. डॉ. कोसंबी यांच्या मते मौर्यांच्या पतनाचे सर्वांत महत्त्वाचे कारण कोणते?
7. मौर्यकाळात शेतीखालची जमीन मालकीहक्कावरून कोणत्या दोन प्रकारांत विभागली होती?
8. भूगोल या ग्रंथाचा लेखक कोण?
9. सतीप्रथेहून भिन्न परंतु त्या प्रथेशी सदृश्य असलेला प्राचीन भारतातील स्त्रियांचा आत्मबलिदानाचा प्रकार कोणता?
10. बौद्ध संघाच्या कार्यानिवासासाठी बांधलेल्या सभागृहांना काय म्हणतात?
11. मिन्हाज्-अस-सिराज यांचा सुप्रसिद्ध ग्रंथ कोणता?
12. अल्लाउद्दीनच्या दक्षिण मोहिमेची मुख्य उद्दिष्टे कोणती?
13. 'अचाट कल्पनांचा पुरुष' असे कोणत्या दिल्ली सुलतानास म्हटले जाते?
14. महमूद गवाण हा कोणत्या बहमनी सुलतानाच्या काळात वजीर होता?
15. हिंदुस्तानातील मोगल साम्राज्याचा संस्थापक कोण?

16. बाबर व हुमायून यांच्या तालमीत तयार झालेली कोणती व्यक्ती 'अकबराचा पालक' म्हणून ओळखली जाते?

17. अकबराने राज्याचे एक राष्ट्रीय स्वरूप टिकून त्याला चिरंतनत्व प्राप्त करून देण्यासाठी कोणत्या नव्या धर्माची स्थापना केली?

18. आइन-ए-अकबरी व अकबरनामा या प्रसिद्ध ग्रंथांचा लेखक कोण?

19. अकबराच्या मृत्यूनंतर त्याचा थोरला मुलगा सलीम गादीवर बसला व त्याने जहांगीर हे नाव धारण केले. जहांगीर या शब्दाचा अर्थ काय?

20. दिल्ली सुलतानांच्या गादीवर बसणारी एकमेव स्त्री राज्यकर्ती कोण?

21. चंदेल राज्यकर्त्यांच्या काळात, भारतीय वास्तुकारांच्या प्रतिभेचा व कौशल्याचा सर्वश्रेष्ठ अविष्कार असणारी मंदिरे कुठे बांधण्यात आली?

22. बुद्ध चरित्र हे महाकाव्य कोणी लिहिले?

23. पंचतंत्र या कथासंग्रहाचा लेखक कोण?

24. गुप्त काळातील, कालिदासाच्या श्रेष्ठ नाट्यकृती कोणत्या?

25. नाशिक, नाणेघाटातील लेण्या कोणत्या कालखंडातील आहेत?

26. वैदिक कालखंडात गावाच्या प्रमुखास काय म्हणत?

SECTION - C (गुण : 28)

हा विभाग दीर्घोत्तरी स्वरूपाचा आहे. या विभागाला 28 गुण आहेत. या विभागाला उणे गुणपद्धत लागू नाही.

कोणतेही चार सोडवा.

1. संगम साहित्याबद्दल थोडक्यात माहिती लिहा.

2. गुप्त कालखंडास सुवर्णयुग मानले जाते. या सुवर्णयुगाची प्रमुख वैशिष्ट्ये कोणती?

3. महंमद तुघलकाने कोणत्या कारणास्तव राजधानीचे स्थलांतर केले?

4. औरंगजेबाच्या दक्षिणेतील स्वारीची कारणे कोणती?

5. बौद्ध धर्म विचारसरणीची तत्त्वे स्पष्ट करा.

6. वैदिक व उत्तर वैदिक कालखंडातील राजकीय जीवन थोडक्यात स्पष्ट करा.

